# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
# अधिसभेच्या १८ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत
# मंगळवार, दि.१७ जुलै, २०१८ दुपारी १२:०० वा.

अधिसभेची १८ वी बैठक दि.१७ जुलै, २०१८ रोजी दुपारी १२:०० वा. विद्यापीठ सभागृहात मा. कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | मा. डॉ. मृणालिनी फडणवीस - कुलगुरु | अध्यक्षा |
| २) | प्राचार्य डॉ. उबाळे व्ही. पी. | सदस्य |
| ३) | प्राचार्या डॉ. श्रीमती पांडे के. ए. | सदस्या |
| ४) | प्राचार्य डॉ. कदम एम. एस. | सदस्य |
| ५) | प्राचार्य डॉ. गोरे एस. एस. | सदस्य |
| ६) | श्री. पाटील बी. पी., संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ | सदस्य |
| ७) | डॉ. शेवाळे बी. सी., वित्त व लेखा अधिकारी | सदस्य |
| ८) | डॉ. धामनस्कर आर. एस., विभागीय सहसंचालक, सोलापूर विभाग, सोलापूर मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) पुणे यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ९) | डॉ. मोहितकर व्ही. एम., मा. शिक्षण संचालक (तंत्र शिक्षण) मुंबई यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| १०) | प्रा. डॉ. घुटे व्ही. बी. | सदस्य |
| ११) | श्री. शिंदे एस. एन. | सदस्य |
| १२) | डॉ. पवार एस. के. | सदस्य |
| १३) | प्राचार्य डॉ. चिट्टे जी. एन. | सदस्य |
| १४) | प्राचार्य डॉ. कोटी एस. व्ही. | सदस्य |
| १५) | प्राचार्य डॉ. परिचारक डी. एस. | सदस्य |
| १६) | प्राचार्य डॉ. पाटील आर. आर. | सदस्य |
| १७) | प्राचार्य डॉ. शिंगाडे ए. बी. | सदस्य |
| १८) | प्राचार्य डॉ. भांजे बी. एम. | सदस्य |
| १९) | श्री. नवले एस. एस. | सदस्य |
| २०) | श्री. पाटील पी. टी. | सदस्य |
| २१) | डॉ. रोंगे बी. पी. | सदस्य |
| २२) | श्री. शिंदे आर. बी. | सदस्य |
| २३) | श्री. आवळे ए. के. | सदस्य |
| २४) | कु. मोहिते-पाटील एस. जे. | सदस्या |
| २५) | डॉ. आवताडे एच. के. | सदस्य |
| २६) | डॉ. चव्हाण सी. एस. | सदस्य |
| २७) | डॉ. बारबोले ए. एन. | सदस्य |

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| २८) | डॉ. काळजे ए. एम. | सदस्य |
| २९) | डॉ. बिराजदार जी. डी. | सदस्य |
| ३०) | डॉ. शिंदे टी. व्ही. | सदस्य |
| ३१) | डॉ. आदटराव बी. एन. | सदस्य |
| ३२) | डॉ. शिंदे एस. के. | सदस्य |
| ३३) | डॉ. फुलारी टी. जे. | सदस्य |
| ३४) | डॉ. श्रीमती रेवडकर बी. डी. | सदस्या |
| ३५) | डॉ. मेंते आर. एस. | सदस्य |
| ३६) | डॉ. कांबळे जी. एस. | सदस्य |
| ३७) | श्रीमती चव्हाण ए. सी. | सदस्या |
| ३८) | श्री. साळुंके एस. एस. | सदस्य |
| ३९) | श्री. गायकवाड आर. एस. | सदस्य |
| ४०) | श्री. शेख ए. एम. | सदस्य |
| ४१) | श्री. गायकवाड एस. एम. | सदस्य |
| ४२) | श्री. सरवदे एस. टी. | सदस्य |
| ४३) | श्री. राणे जी. एफ. | सदस्य |
| ४४) | श्री. गावडे टी. जे. | सदस्य |
| ४५) | श्रीमती मंकणी एन. एस. | सदस्या |
| ४६) | श्रीमती नागणसुरे पी. आर. | सदस्या |
| ४७) | श्री. चव्हाण डी. ए. | सदस्य |
| ४८) | ॲड. कळके ए. एस. | सदस्य |
| ४९) | श्री. डांगरे एम. एस. | सदस्य |
| ५०) | श्री. धरणे जी. आर. | सदस्य |
| ५१) | प्रा. डॉ. देशमुख एम. बी. | सदस्य |
| ५२) | श्रीमती महागांवकर आर. ए. | सदस्या |
| ५३) | श्री. पाटील एस. बी. | सदस्य |
| ५४) | श्री. हिरेमठ एस. बी. | सदस्य |
| ५५) | श्रीमती तडवळकर ए. ए. | सदस्या |
| ५६) | डॉ. चौधरी एस. बी. | सदस्य |
| ५७) | श्री. संगवे ए. बी. | सदस्य |
| ५८) | श्रीमती करगुळे व्ही. ए. | सदस्या |
| ५९) | श्री. शिंदे एस. व्ही. | सदस्य |
| ६०) | डॉ. मंझा जी. आर., कुलसचिव | सदस्य सचिव |

**स्वागत:**

मा. कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष आणि अधिसभेचे सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले.

**अनुपस्थिती :**

श्री. अनासपुरे एम. एम. अधिसभेच्या या बैठकीस अनुपस्थित होते.

कुलसचिवांनी परिनियम ४७४ (१) नुसार, मा. कुलगुरुंना सोळाव्या अधिसभेच्या बैठकीपासून या बैठकीदरम्यानच्या कालावधीतील विद्यापीठातील घडामोडीचा आणि प्रगतीचा अहवाल सादर करण्याबाबत विनंती केली व त्याप्रमाणे मा. कुलगुरुंनी खालीलप्रमाणे अहवाल सादर केला.

<u>कुलसचिव कार्यालय</u>

- महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०३ अन्वये प्रस्तुत विद्यापीठाच्या सर्व संकुलातील नियमित शिक्षकांना कार्यभार वगळून उर्वरित कार्यभारासाठी Walk in Interview ची जाहिरात देवून दि.१९/०६/२०१८ व दि.२०/०६/२०१८ रोजी उपस्थित उमेदवारांची मुलाखत घेऊन निवड समितीने एकूण २६ उमेदवारांची शिफारस केली आहे. निवड झालेल्या उमेदवारांना कंत्राटी शिक्षक म्हणून नियुक्ती आदेश पारित केले.
- मा. संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांच्या सुचनेनुसार Screening Committee ची बैठक पुढे ढकलण्यात आली आहे, तर Selection Committee ची बैठक नियाजित तारखेस म्हणजेच दि.२८/०६/२०१८ रोजी घेण्यात आली. सदर कमिटीने शिफारस केल्यानुसार कॅस अंतर्गत पदोन्नतीचे आदेश पारित करण्याची प्रक्रिया सुरु आहे.
- प्रस्तूत विद्यापीठास संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण हे पद भरण्यासाठी विविध वर्तमान पत्रात जाहिरात देऊन पात्र उमेदवारांच्या दि.२३/०६/२०१८ रोजी मुलाखती घेऊन प्राचार्य डॉ. सुरेश किसनराव पवार यांची सदर पदी आदेश क्र.SUS/ESTT/A.O./२०१८/५२८०, दि.२५/०६/२०१८ रोजी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानुसार डॉ. पवार एस. के. हे संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण या पदावर दि.२५/०६/२०१८ रोजी मध्यान्होत्तर रुजू झाले आहेत.
- प्रस्तुत विद्यापीठास संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचार्य मंडळ पद भरण्यासाठी विविध वर्तमान पत्रात जाहिरात देऊन पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत. प्राप्त झालेल्या अर्जामधून पात्र उमेदवारांची लवकरच मुलाखत आयोजित करण्यात येणार आहे.
- अभियांत्रिकी विभागाकडून करण्यात येणाऱ्या ग्रंथालय दुरुस्तीचे (अंदाज पत्रकीय किंमत ₹१९.९८ लाख) काम अंतिम टप्प्यात आहे.
- विद्यापीठातील विविध विभागातील वर्क स्टेनशसाठी लागणारे फर्निचर तयार करुन बसविण्याचे (अंदाजपत्रकीय किंमत ₹६२.३५ लाख) काम सुरु आहे.

- प्रस्तूत विद्यापीठातील १०० केव्हीए चा सोलर जनरेशन सिस्टीम बसविण्याचे (अंदाजपत्रकीय किंमत ₹९८.५५) काम पुर्ण झाले असून देयक आदा करण्यात आले आहे.
- विद्यापीठातील ड्रेनेजचे, वेस्ट वॉटर ट्रिटमेंट, रेन वॉटर हार्वेस्टिंगचे (अंदाजपत्रकीय किंमत अनुक्रमे ₹२४.५०, ₹५०.००, ₹१०.०० लाख) अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याकडे तात्रिक मंजूरीकरिता सादर करण्यात आले आहे.
- मुलांचे व मुलींचे वसतीगृह बांधण्यासाठी (अंदाजपत्रकीय किंमत अनुक्रमे प्रत्येकी ₹७००.०० लाख) अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाकडून आदिवासी शासकीय वसतीगृह विभागाकडे सादर करण्यात आले आहे.
- पदार्थविज्ञान व रसायनशास्त्र इमारतीच्या दुरुस्तीचे (अंदाजपत्रकीय किंमत अनुक्रमे ₹१९.९२, ₹१९.७३ लाख) काम सुरु आहे.
- विद्यापीठात दीक्षांत समारंभाच्या मल्टीपर्पज हॉल बांधण्यासाठी (अंदाजपत्रकीय किंमत ₹२७१.०० लाख) अंदाजपत्रक कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२ यांच्याकडून तपासून अधिक्षक अभियंता यांच्या कार्यालयाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आले आहे.
- विद्यापीठात इलेक्ट्रॉनिक्स इमारत बांधण्याचे (अंदाजपत्रकीय किंमत ₹२७०.०० लाख) मुख्य अभियंता, पुणे यांच्याकडून जॉब नंबर प्राप्त करण्याची प्रक्रिया सुरु आहे.
- विद्यापीठाचे मुख्य प्रशासकीय इमारत व परीक्षा भवन बांधण्याचे (अंदाजपत्रकीय किंमत ₹२२००.०० लाख) अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तात्रिक मंजुरीकरिता तपासणी चालू आहे.
- सामाजिकशास्त्रे संकुलाकडील सेमिनार हॉल व कॉन्फरन्स हॉलचे नुतनीकरणाच्या कामाचे फेज-१, फेज- २ (अंदाजपत्रकीय किंमत अनुक्रमे ₹२४.७७, ₹१३.४४ लाख) कार्यारंभ आदेश देण्यात आले आहे.
- भूशास्त्र संकुल इमारतीमध्ये परीक्षा हॉलचे बांधकाम करण्याचे (अंदाजपत्रकीय किंमत ₹१९.०२ लाख) काम पूर्ण झाले आहे.
- शास्त्रीय उपकरण केंद्र इमारतीचे पहिल्या मजल्याचे बांधकाम करण्याचे काम (अंदाजपत्रकीय किंमत ₹३१.४० लाख) काम सुरु आहे.
- मेस क्र.१ व क्र. २ चे वाढीव बांधकाम करण्याचे (अंदाजपत्रकीय किंमत अनुक्रमे प्रत्येकी ₹३८.१९ लाख) काम सुरु आहे.
- ४०० मीटर ॲथलेटिक ट्रॅक तयार करण्याचे काम (अंदाजपत्रकीय किंमत ₹३५.०० लाख) काम सुरु आहे.
- व्ही. आय. पी. अतिथीगृहाचे वाढीव बांधकाम करण्याचे (अंदाजपत्रकीय किंमत ₹१८०.०० लाख) वाढीव बजेटची मान्यता व्यवस्थापन परिषदेमध्ये मिळालेली आहे. त्यानुसार, पुढील कार्यवाही सुरु आहे.

- हेल्थ सेंटरच्या इमारतीचे बांधकाम (अंदाजपत्रकीय किंमत ₹३२.०० लाख) प्रगतीपथावर आहे.
- फॅकल्टी क्लब इमारतीचे बांधकाम करणे (अंदाजपत्रकीय किंमत ₹२०१.०० लाख) या कामाच्या वाढीव सुधारित कामाची प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठीचा विषय दि.१२/०६/२०१८ रोजीच्या बांधकाम समितीच्या बैठकीत ठेवण्यात आलेला होता. परंतु सदर विषय तपशीलवार पुढील बैठकीत ठेवण्याचा ठराव करण्यात आला आहे.
- संगणकशास्त्र संकुलामध्ये लिफ्ट बसविण्याकरिता लागणारे बांधकाम (अंदाजपत्रकीय किंमत ₹१६.३३ लाख) चे काम सुरु आहे. तसेच आर्किटेक्ट यांच्याकडून इस्टिमेट (अंदाजपत्रकीय किंमत ₹२३.८२ लाख) प्राप्त झाले आहे. त्यानुसार, पुढील कार्यवाही सुरु आहे.
- ४८२ एकर परिसरामध्ये सुरक्षा भिंतीचे बांधकाम करण्याचे (अंदाजपत्रकीय किंमत ₹१९०.०० लाख) सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सदर कामाचे अंदाजपत्रक मागविण्याची प्रक्रिया सुरु आहे.

**शैक्षणिक, संशोधन आणि विकास**

- कौशल्य विकासकेंद्रातंर्गत सुरु असणाऱ्या ६ महिने व १ वर्षाच्या कालावधीसाठी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ साठी विविध नविन अभ्यासक्रमाचा अभ्यासक्रम निश्चित करण्यासाठी बैठकांचे आयोजन करण्यात आले होते. त्यानुसार अभ्यासक्रम निश्चित करण्यात आला आहे. कौशल्य विकास केंद्रातंर्गत महाविद्यालये / संस्थाना संलग्निकरणाची मान्यता देण्यात आली आहे. तसेच संलग्निकरणाच्या नुतनीकरणासाठीचे प्रस्ताव सादर करण्यात आलेले होते. त्यासाठी स्थानिक चौकशी समिती गठीत करण्यात आली होती.
- कौशल्य विकासकेंद्रातंर्गत शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील द्वितीय सत्रातील ६ महिने व १ वर्ष कालावधीच्या विविध अभ्यासक्रमाच्या परीक्षा माहे मे, २०१८ ला ८ विविध केंद्रावर घेण्यात आल्या आहेत. तसेच या अभ्यासक्रमाच्या परीक्षांचे सर्व निकाल ३० दिवसात घोषित करण्यात आले आहेत व लेजर तपासून महाविद्यालय / संस्थेला वितरित करण्यात आले आहे.
- कौशल्य विकासकेद्रांतर्गत ६ महिने व १ वर्षाच्या कालावधीसाठी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ साठी विविध महाविद्यालय / संस्थेकडून नुतनीकरणसाठी / संलग्निकरणासाठी मा. कुलगुरुमहोदयांनी चार सदस्यीय समिती गठीत केली होती. त्यानुसार समितीने दि.०८/०६/२०१८, ०९/०६/२०१८ व दि.३०/०६/२०१८ रोजी विविध महाविद्यालय / संस्थेस भेट देवून अहवाल सादर केला. सदर अहवालास मा. कुलगुरुमहोदयांनी मान्यता दिली आहे. त्यानुसार संबधित महाविद्यालयास नुतनीकरणाचे व संलग्निकरणाची कार्यवाही करण्यात येत आहे.
- विनाअनुदानित महाविद्यालयातील प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने ४ प्राचार्यांना शैक्षणिक वर्ष २०१८-१९ साठी पुन:श्च एका वर्षासाठी मान्यता देण्यात आली.
- महाविद्यालयातील रिक्त प्राचार्य पदी ५ महाविद्यालयातील सेवाजेष्ठ अध्यापकांना प्रभारी प्राचार्य पदी मान्यता दिली आहे.

- संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक व प्राचार्य यांच्या मधून उत्कृष्ट प्राचार्य व शिक्षक पुरस्कार देण्यासाठी सर्व महाविद्यालयाकडून प्रस्ताव मागविण्यासाठी परिपत्रक काढण्यात आले.
- नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीच्या वयोमर्यादेत वाढ करण्याबाबतच्या प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने विज्ञान महाविद्यालय, सांगोला या महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. एस. बी. जुंदळे यांच्याबाबत आढावा समितीची बैठक घेवून कार्यवाही पूर्ण करण्यात आली.
- कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर या महाविद्यालयातील ३ सहाय्यक प्राध्यापक आणि छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड कॉमर्स, सोलापूर या महाविद्यालयातील १ सहाय्यक प्राध्यपक अशा एकूण ४ सहाय्यक प्राध्यापकांना सहाय्यक प्राध्यापक स्टेज १ ते २ व स्टेज २ ते ३ मध्ये स्थाननिश्चिती करण्यात आली.
- डी. बी. एफ. दयानंद कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड सायन्स, सोलापूर या महाविद्यालयातील १ सहाय्यक प्राध्यापक, संतोष भीमराव पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मंद्रुप या महाविद्यालयातील ३ सहाय्यक प्राध्यापक आणि संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर या महाविद्यालयातील १ सहाय्यक प्राध्यापक अशा एकूण ५ सहाय्यक प्राध्यापकांना सहाय्यक प्राध्यापक संवर्गातून सहयोगी प्राध्यापक संवर्गात पदोन्नती देण्यात आली
- संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर या महाविद्यालयातील १ सहाय्यक प्राध्यापक यांना सहाय्यक प्राध्यापक संवर्गातून सहयोगी प्राध्यापक संवर्गात पदोन्नतीकरिता निवड समिती देण्यात आली.

  श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शी या महाविद्यालयातील डॉ. ए. एच. ननवरे, शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज या महाविद्यालयातील डॉ. डी. एस. बागडे, सहकार महर्षि शंकरराव मोहिते - पाटील महाविद्यालय, नातेपुते या महाविद्यालयातील श्री. एस. एच. पवार, श्री. डी. जी. शहाणे आणि श्री. आर. जे. खंदारे,सांगोला महाविद्यालय, सांगोला या महाविद्यालयातील श्री. आर. डी. महिमकर आणि श्रीमती सी. एल. जांभळे,विज्ञान महाविद्यालय, सांगोला या महाविद्यालयातील श्री. बी. बी. नवले आणि सोलापूर सोशल असोसिएशनचे कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड कॉमर्स, सोलापूर या महाविद्यालयातील श्री. एस. क्यू. शेख अशा एकूण ०९ बिगर नेट / सेट अध्यापकांना व्यवस्थापन परिषदेच्या दि.१३/०४/२०१८ च्या बैठकीतील क्र.१८ नुसार सेवा नियमित करुन त्यांना अनुषंगिक लाभ देण्याबाबतचे मान्यता पत्र देण्यात आले.
- यु. जी. सी., पुणे यांच्या पत्राच्या अनुषंगाने विद्यापीठ संलग्नित २ (f) व १२ B असलेल्या महाविद्यालयांची यादी पाठविण्यात आली.
- डी. बी. एफ. दयानंद कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड सायन्स, सोलापूर या महाविद्यालयातील डॉ. आर. एन. मुळीक यांना ऑस्ट्रिया येथे International Conference ला जाण्यासाठी विद्यापीठाकडून आर्थिक सहाय्य ₹५०,०००/- देण्यात आले. तसेच त्यांचे Travel Support Grant Scheme अंतर्गत आर्थिक सहाय्य मिळण्यासाठी युजीसी, नवी दिल्ली येथे प्रस्ताव पाठविण्यात आला.

- विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयातील नव्याने स्टेज १ ते २ (एजीपी ६००० ते ७०००) आणि स्टेज २ ते ३ (एजीपी ७००० ते ८०००) मध्ये पात्र सहाय्यक प्राध्यापकांच्या स्थान निश्चितीकरिता नियमावली तयार करण्याकरिता बैठका घेण्यात आल्या.

**"Seed Money for Research" या योजनेंतर्गत ९ महाविद्यालयातील ९ शिक्षकांना संशोधनाकरिता पहिल्या हप्त्याची एकूण रक्कम ₹४,११,०००/- मा. कुलगुरु महोदयांच्या हस्ते वितरीत करण्यात आली.**

| अ. क्र. | शिक्षकांचे नाव | महाविद्यालयाचे नाव | विषय | पहिला हप्ता | दुसरा हप्ता | देय रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | डॉ. एस. वाय. जाधव | डी. बी. एफ. दयानंद कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड सायन्स, सोलापूर | रसायनशास्त्र | ₹६२,५००/- | ₹२७,५००/- | ₹९०,०००/- |
| २. | डॉ. पी. व्ही. देशमुख, | प्रतापसिंह मोहिते-पाटील महाविद्यालय, करमाळा | सूक्ष्मजीवशास्त्र | ₹६७,५००/- | ₹१७,५००/- | ₹८५,०००/- |
| ३. | श्रीमती व्ही. एस. क्षीरसागर | स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पंढरपूर | सिव्हिल इंजिनिअरिंग | ₹७२,५००/- | ₹१२,५००/- | ₹८५,०००/- |
| ४. | श्री. व्ही. ए. बिंगी | वालचंद इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी, सोलापूर | कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड इंजिनिअरींग | ₹३३,०००/- | ₹२,०००/- | ₹३५,०००/- |
| ५. | डॉ. आर. जी. कुलकर्णी | कॉलेज ऑफ फार्मसी, पंढरपूर | फार्मसी | ₹५०,०००/- | ₹५०,०००/- | ₹१,००,०००/- |
| ६. | डॉ. वाय. एस. थोरात | कॉलेज ऑफ फार्मसी, सोलापूर | फार्मासुटीक्स | ₹६५,०००/- | ₹१५,०००/- | ₹८०,०००/- |
| ७. | डॉ. आय. जे. तांबोळी | सोलापूर सोशल असोसिएशन आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज, सोलापूर | मराठी | ₹२०,०००/- | ₹१०,०००/- | ₹३०,०००/- |
| ८. | डॉ. डी. जी. सोनटक्के | कर्मवीर भाऊरापाटील महाविद्यालय, पंढरपूर | मराठी | ₹१७,५००/- | ₹१२,५००/- | ₹३०,०००/- |
| ९. | डॉ. व्ही. बी. बंडगर | उमा शिक्षणशास्त्र महाविद्यालय, पंढरपूर | शिक्षणशास्त्र | ₹२३,०००/- | ₹७,०००/- | ₹३०,०००/- |
| | | | **एकूण** | **₹ ४,११,०००** | **₹१,५४,०००** | **₹५,६५,०००** |

- Block Grant to College Scheme अंतर्गत सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील महाविद्यालय, नातेपुते या महाविद्यालयाचा प्रस्ताव युजीसी, पुणे यांना पाठविण्यात आला. तसेच Planning Board साठी श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शी यांना विद्यापीठ प्रतिनिधी देण्यात आले.
- "One Day Training Proramme on Human Rights" चा सांगोला महाविद्यालय, सांगोला या महाविद्यालयाचा प्रस्ताव Dr. Sanjay Dubey, New Delhi यांना पाठविण्यात आला.
- संगमेश्वर कॉलेज, सोलापूर या महाविद्यालयाच्या मुलींच्या वस्तीगृहाच्या पडताळणी समितीचा अहवाल युजीसी, पुणे यांना पाठविण्यात आला.
- प्रस्तूत विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य, सहाय्यक प्राध्यापक, ग्रंथपाल व शा. शि. संचालकांची रिक्त पदे भरण्यासाठी प्राप्त झालेल्या दोन (०२) प्रस्तावांमध्ये त्रुटी आढळल्याने, त्रुटीची पूर्तता करण्याबाबत संलग्न महाविद्यालयांना सूचित करण्यात आले.

- विशेष कक्ष विभागात सहाय्यक प्राध्यापक पदासाठी दि.०६ मे, २०१८ ते ३० जून, २०१८ अखेर तीन (०३) मागासवर्गीय उमेदवारांनी नाव नोंदणी केलेली असून, नाव नोंदणी केलेल्या उमेदवारांची नावे विद्यापीठाच्या su.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर “Special cell” या शिर्षकाखाली प्रसिध्द करण्यात आली आहेत. तसेच एका (१) उमेदवाराच्या कागदपत्रांमध्ये त्रुटी आढळल्याने, त्यांना त्रुटीची पूर्तता करणेबाबत कळविण्यात आले आहे व एका (१) उमेदवाराच्या नाव नोंदणीचे नुतनीकरण करण्यात आले आहे.
- संलग्नित महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांमधून प्रतिवर्षी एका कर्मचाऱ्यास विद्यापीठ वर्धापन दिनी "गुणवंत कर्मचारी पुरस्कार" प्रदान करण्यात येतो, त्यानुषंगाने सन २०१८ साठी गुणवंत कर्मचारी पुरस्कारासाठी इच्छूक असलेल्या महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांकडून प्रस्ताव मागणीसाठी अर्जाचा नमूना व नियमावली इत्यादी संबंधित महाविद्यालयांना पाठविण्यात आले आहेत.
- आस्थापना विभागाकडून शैक्षणिक वर्ष २०१८-१९ साठी संकुलनिहाय तात्पुरत्या शिक्षकांची पदे भरतीसाठी प्राप्त मंजूर पदानुसार आरक्षण निश्चित करुन देण्यात आले आहे.
- व्यवस्थापन परिषद बैठक दि.१३/०४/२०१८ ठराव क्र.१५ अन्वये पारित ठरावानुसार दि.०१/०१/२०१८ ते ३१/१२/२०१८ या तीन वर्षासाठी विशेष कक्ष स्थायी समितीसाठी नामनिर्देशित करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना निमनिर्देशनाबाबत पत्र पाठविण्यात आले आहे. तसेच सदर तरतूदीमधील एक पद महाराष्ट्र शासनाचे प्रतिनिधी म्हणून असल्याने, सदर महाराष्ट्र शासनाच्या प्रतिनिधीचे नामनिर्देशन होऊन मिळणेसाठी शासनास पत्रव्यवहार केलेला आहे.
- अनाथ मुलांना खुल्या प्रवर्गातून १% आरक्षणाबाबतचा शासन निर्णय क्र.अमुजा-२०११/ प्र.क्र.२१२ / मा-३, दि.०२ एप्रिल, २०१८ संलग्नित महाविद्यालयांना माहितीस्तव व योग्य त्या पुढील कार्यवाहीस्तव पाठविण्यात आला आहे.
- पीएच. डी व एम. फील अभ्यासक्रमास एकूण २६ विद्यार्थ्यांच्या मौखिक परीक्षा घेण्यात आल्या.
- संशोधन व मान्यता समितीच्या बैठका :

  विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा - ७, मानवविज्ञान विद्याशाखा -८,

  आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा - १, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा -१
- विभागीय संशोधन समितीच्या बैठका :

  विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा -११, मानवविज्ञान विद्याशाखा -७,

  आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा -२

<u>परीक्षा व मूल्यमापन विभाग</u>

- मार्च / एप्रिल, २०१८ मधील सर्व अभ्यासक्रमाचे निकाल जाहीर करण्यात आले असून पुनर्मूल्यांकनाचे निकाल विहीत वेळेत विद्यापीठ संकेतस्थळावर जाहीर करण्यात येत आहेत.

- मार्च / एप्रिल, २०१८ मधील सर्व अभ्यासक्रमांच्या प्रश्नपत्रिका ह्या १०० टक्के ऑनलाईन वितरण प्रणालीद्वारे पाठविण्यात यशस्वी ठरले आहे.
- शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील एम. ए. / एम. एस्सी. या अभ्यासक्रमाचे प्रवेश पूर्व परीक्षेचे ऑनलाईन पध्दतीने संगणकीय प्रणालीद्वारे यशस्वीरित्या अंमलबजावणी करण्यात आली.
- दि.२०/०६/२०१८ रोजी NAD, नवी दिल्ली यांनी अयोजित केलेल्या कार्यशाळेस श्री. बी. पी. पाटील संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ उपस्थित होते.
- माहे मार्च / एप्रिल २०१८ मध्ये बी. ए. वगळता सर्व अभ्यासक्रमाचे उत्तरपत्रिका ह्या बारकोड प्रणालीद्वारे वापरण्यात यशस्वी ठरले आहे.
- श्री. बी. पी. पाटील, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांची संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथील परीक्षा व मूल्यमापन मंडळावर महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील ४७ (३) (h) नुसार नामनिर्देशित करण्यात आले आहे.

<u>वित्त व लेखा विभाग</u>

- सोलापूर विद्यापीठासाठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता संवैधानिक लेखापरिक्षण करण्याकरिता सनदी लेखापाल मे. टॅप असोसिएट, सोलापूर यांची व्यवस्थापन परिषदेने नियुक्ती केलेली असून त्यानुसार मे. टॅप असोसिएटस्, सोलापूर यांनी विद्यापीठाचे सन २०१७-१८ मधील लेखांचे संवैधानिक लेखापरीक्षण पूर्ण केले असून अहवाल अंतिम करण्याचे काम सुरु आहे.
- कुलपती कार्यालय व विद्यापीठ अनुदान आयोग यांनी कॅशलेस संदर्भात दिलेल्या सुचनेनुसार विद्यापीठ परिसरातील सर्व संकुलाची फी ॲक्सिस बँक यांनी Easy Pay System यांचे मार्फत ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात आली असून, त्यामधून विद्यार्थी फी ऑनलाईन पध्दतीने भरत आहेत. त्यामुळे परिसरातील सर्व फी कॅशलेस पध्दतीने प्राप्त होईल.

<u>नॅक व रुसा विभाग</u>

- RUSA अंतर्गत दि.०८/०५/२०१८ रोजी सकाळी ११.०० वा. मा. कुलगुरुमहोदयांच्या अध्यक्षतेखाली संनियंत्रण समितीची बैठक आयोजित करण्यात आली.
- दि.१४/०५/२०१८ रोजी दु.४.०० वा. Internal Quality Assurance Cell (IQAC)ची बैठक मा. कुलगुरु महोदयांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली.
- RUSA अंतर्गत Challenge Level Funding या विषयावर दि. ०१/०६/२०१८ रोजी मा. प्र. कुलगुरुमहोदयांच्या अध्यक्षतेखाली एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.
- नॅक, बेंगलोर यांच्या Revised Accreditation Framework बाबत दि.२९/०६/२०१८ रोजी मा. कुलगुरुमहोदयांच्या अध्यक्षतेखाली एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

<u>ज्ञानस्त्रोत केंद्र</u>

- ज्ञानस्त्रोत केंद्रामार्फत दि.३०/०५/२०१८ व ३१/०५/२०१८ रोजी सामाजिकशास्त्रे संकुलात ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यापीठातील सर्व संकुलाचे संचालक, प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी यांनी ३,६९३ पुस्तकांची खरेदीची शिफारस केली आहे.
- ज्ञानस्त्रोत केंद्रात वर्तमानपत्रे वाचण्यासाठी येणाऱ्या वाचकांसाठी लोखंडी स्टँड खरेदी करण्यात आली आहे.
- सोलापूर विद्यापीठाच्या ज्ञानस्त्रोत केद्रासाठी RUSA Phase II अंतर्गत मिळणाऱ्या अनुदानातुन EZ Proxy Remote Assessing या Software ची खरेदी प्रक्रिया पूर्ण झाली आहे.
- सोलापूर विद्यापीठाच्या ज्ञानस्त्रोत केद्राचे आधुनिकीकरण करण्यासाठी RUSA Phase II अंतर्गत मिळणाऱ्या अनुदानातून १. FedGate २. D Space ३. RFID System ची खरेदी प्रक्रिया चालू आहे.
- ज्ञानस्त्रोत केंद्राकडून J-Gate + JCCC Online Journals अंतर्गत विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांना विविध विषयाची ४०,००० e-Journals Online उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

<u>संकुले</u>

- पदार्थविज्ञान संकुलाकडील संशोधन प्रयोगशाळे करिता RUSA अंतर्गत BET Surface Area and Pore Size Analyzer हे शास्त्रीय उपकरण व संकुलाकडील प्राध्यापक व संचालक प्रा. एस. एस. सुर्यवंशी यांना DST SERB, New Delhi या संस्थेकडून संशोधन प्रकल्पाअंतर्गत Electrochemical Workstation हे शास्त्रीय उपकरण खरेदी करण्यात आले.
- पदार्थ विज्ञान संकुलामधील तीन विद्यार्थ्यांस पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली.
- भूशास्त्र संकुलाकडील एम. एस्सी. भाग २ मधील श्री. गणेश पवार आणि श्री. अमित कोकाटे उन्हाळी प्रशिक्षणाकरिता Centre for Marine Living Resources and Ecology, Kochi येथे उपस्थित होते. सदरील प्रशिक्षण दरम्यान उपरोक्त विद्यार्थ्यांनी FORV Sagar Sampada Cruise no. ३७५ यामध्ये सहभाग नोंदविला.
- संकुलाकडील सहायक प्राध्यापक डॉ. व्ही. पी. धुळप यांनी श्री. विठ्ठल एज्युकेशन रिसर्च इन्स्टिट्यूट कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथे दि.२२ जून २०१८ रोजी "पंढरपूर शहरातील नागरिकांचे जलपद चिन्हाची कपात करणे" या विषयावरील आयोजित एक दिवसीय कार्यशाळेमध्ये उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.
- संकुलाकडील एम. एस्सी. भाग २ भूमाहितीशास्त्र विषयातील उत्तीर्ण १४ पैकी ११ विद्यार्थ्यांची मुंबई येथील Genesys International Co. Ltd. येथे नियुक्ती झाली आहे.
- संकुलाकडील प्रा. पी. प्रभाकर यांनी "Hydrochemical Characterization and Quality appraisal of groundawater suitability for irrigation purpose in semi-arid region of Baltira watershed, Sangli Dist., Maharashtra" या विषयावरील पेपर Pramana Rfs.Jour. Vol. ८.१५५.५.५७-६५PP करिता प्रकाशित केले आहे.

- प्रा. पी. प्रभाकर यांचे “Air affair in the propose smart city of Solapur” या विषयावरील पेपर Indian Society of Applied Geochemist यांनी प्रकाशनासाठी स्विकारले आहे.
- जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून दि.०५ जून, २०१८ रोजी भूशास्त्र संकुलामार्फत पर्यावरण दिन वृक्षारोपण कार्यक्रम आणि प्लास्टिक वापर बंदीच्या संकल्पनेने साजरा करण्यात आला.
- सामाजिकशास्त्रे संकुलातील मास कम्युनिकेशन विभागात दि.१३/०५/२०१८ रोजी ईटीव्ही भारत तर्फे कॅम्पस मुलाखती घेण्यात आल्या. त्यात ३० विद्यार्थ्यांच्या मुलाखती झाल्या. त्यातील १४ जणांची ईटीव्ही भारतने निवड केली.
- सामाजिकशास्त्रे संकुलात मा. कुलगुरुंच्या हस्ते नेट-सेट परीक्षेत तसेच ईटीव्ही भारतसाठी निवड झोलेल्या विद्यार्थ्यांच्या सत्काराचा कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला.
- लोकमत तर्फे आयोजित “अस्पायर” या शैक्षणिक प्रदर्शनात सोलापूर विद्यापीठाच्या स्टॉल आयोजित करण्यात आला होता. दि.१८ ते २० जून, २०१८ दरम्यान या प्रदर्शनात भेट देण्याऱ्या व्यक्तींना विद्यापीठातील विविध अभ्यासक्रमांची माहिती डॉक्युमेंट्री बॅनर्स व प्रत्यक्षपणे देण्यात आली.

<u>विद्यार्थी विकास विभाग</u>

- सन २०१८-१९ या वर्षात संलग्न महाविद्यालयातून शिक्षण घेणारे विद्यार्थी त्यांचे पालक यांचा ₹५९/- प्रमाणे एच. डी. एफ. सी. एर्गो जनरल इन्सुरन्स कंपनी लि. सोलापूर यांच्याकडे तर शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी यांचा विमा ओरिएंन्टल इन्सुरन्स कंपनी लि., ठाणे यांच्याकडे ₹६०/- इतक्या अल्प दरात ₹१०,००,०००/- (दहा लाख) अपघाती विमा उतरविण्याची कार्यवाही करण्यात येवून महाविद्यालयातील प्रवेशापूर्वी सर्व संलग्न महाविद्यालयास विमा बाबत कळविण्यात आले आहे.
- सोलापूर विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांच्या साहित्य आणि कलागुणांना सुयोग्य संधी मिळावी या उद्देशाने सोलापूर विद्यापीठातर्फे पारंपारिक व व्यावसायिक महाविद्यालयांची नियतकालिक स्पर्धा सुरु करण्यात आली आहे.
- सन २०१७-१८ या वर्षातील स्पर्धेसाठी पारंपारिक व व्यावसायिक महाविद्यालयांना सहभागी होण्यासाठी दि.०५/०५/२०१८ ही तारीख देण्यात आली होती. त्यानुसार एकूण ३१ महाविद्यालयांनी सदर स्पर्धेत सहभाग नोंदविला आहे. त्यापैकी पारंपारिक महाविद्यालये २२ व व्यावसायिक महाविद्यालये ०९ अशी आहेत. मा. कुलगुरुमहोदयांच्या मान्यतेनुसार विविध परीक्षकांना सदरचे नियतकालिक परिक्षणासाठी पोहोच करण्यात आले आहे.

<u>क्रीडा विभाग</u>

- महाविद्यालयांच्या व विद्यापीठातील विद्यार्थ्यांच्या शारीरिक व मानसिक आरोग्य क्षमतेबाबत परस्पर संवाद दि.२१/०५/२०१८ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे आयोजित मिशन यंग ॲन्ड फिट इंडिया या कार्यशाळेस उपस्थित राहून त्या कार्यक्रमाचा आढावा क्रीडा समन्वयक यांनी घेतला.
- अखिल भारतीय विश्वविद्यालय, नवी दिल्ली यांना सन २०१८-१९ च्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ हॅन्डबॉल (मुलांच्या) स्पर्धा आयोजनाची मागणी करण्यात आली होती. त्यानुसार नुकत्याच AIU च्या झालेल्या बैठकीत सोलापूर विद्यापीठास हॅन्डबॉल मुलांच्या स्पर्धा आयोजनाची जबाबदारी देण्याचे प्राथमिक स्तरावर निर्णय झाला आहे.

सदर बैठकीत पुढीलप्रमाणे कामकाज झाले.

[ १ ] **अधिसभेच्या दि.२१ ऑगस्ट, २०१७ रोजी झालेल्या सोळाव्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.**

(टिपणी: सर्व अधिसभा सदस्यांना परिनियम क्र.४८५ नुसार विद्यापीठ पत्र जा.क्र. सोविसो /सनिवि/अधिसभा/६०८१, दि.२२/०८/२०१७ अन्वये, दि.२१ ऑगस्ट, २०१७ रोजी झालेल्या सोळाव्या बैठकीचा कार्यवृत्तांत पाठविण्यात आलेला होता. या कार्यवृत्तांतामध्ये दुरुस्त्या सुचविण्याची अंतिम तारीख दि.१९/०९/२०१७ अशी होती. या मुदतीत कोणत्याही सदस्यांकडून दुरुस्त्या प्राप्त झालेल्या नाहीत.

सबब, अधिसभेचा दि.२१ ऑगस्ट, २०१७ रोजी झालेल्या सोळाव्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करण्यासाठी मान्यतेसाठी सादर).

ठराव: **अधिसभेच्या दि.२१ ऑगस्ट, २०१७ रोजी झालेल्या सोळाव्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करण्यात आला.**

**[ 2 ] Elections to the Management Council by amongst the members of the Senate under Section 30 (4) (f), (g), (h), (i) as per Maharashtra Public Universities Act, 2016.**

[Note: Following members are to be elected to the Management Council from amongst members of Senate.

[A] Two Principals of whom one shall be belonging to the category Scheduled Castes (under Section 30 (4) (f))

[B] Two Teachers from amongst the Teachers and University Teachers of whom one shall be belonging to the category Scheduled Castes (under Section 30 (4) (g))

[C] Two Representatives of Managements of whom one shall be belonging to the category Scheduled Castes (under Section 30 (4) (h))

[D] Two Registered Graduates of whom one shall be belonging to the category Scheduled Castes (under Section 30 (4) (i))

**Resolution:**

**A) The following elections are declared unopposed.**

**[I] One Principals (u/s 30 (4) (f))**
**a) Prin. Dr. Anant Balu Shingade (DTNT)**

**[II] One Teachers (u/s 30 (4) (g))**
**a) Dr. Bhagwan Nagnath Adatrao (ST)**

**[III] One Representatives of Managements (u/s 30 (4) (h))**
**a) Shri. Abraham Kisan Awale (SC)**

**[IV] One Registered Graduates (u/s 30 (4) (i))**
**a) Smt. Neeta Sureshbabu Mankani (OBC)**

**B)** For all other elections the candidates themselves are appointed as scrutiniers by the house. Voting started at 12:30 p.m. and closed at 1:30 p.m. Total 60 Voters casted their votes.

**The counting of votes started at 1:35 p.m. and following candidates declared duly elected on the Management Council.**

**[I] One Principals (u/s 30 (4) (f))**
**Prin. Dr. Santosh Vijaykumar Koti**

**[II] One Teachers (u/s 30 (4) (g))**
**Dr. Hanumant Krishna Awatade**

**[III] One Representatives of Managements (u/s 30 (4) (h))**
**Dr. Babruvahan Pandurang Ronge**

**[IV] One Registered Graduates (u/s 30 (4) (i))**
**Smt. Ashwini Chandrakant Chavan**

**[ 3 ] Nomination of One Representatives of Managements from amongst the Representatives of Managements of Senate to the Academic Council under Section 32 (3) (h) of Maharashtra Public Universities Act, 2016.**

[Note: As per Section 32 (3) (h) of the Maharashtra Public Universities Act, 2016; Senate has to nominate One Representative of Managements from the Senate to the Academic Council.

Any member present at the meeting may propose a name of any Representatives of Management but the same name may be seconded by other member. The names for nomination are more than one then the nomination shall be determined by majority votes].

**Resolution:**

**Shri. D. A. Chavan has proposed the name of Shri. P. T. Patil and Dr. B. P. Ronge has seconded the same. No other name was proposed by any other members present in the house. Since there was only one name of Shri. P. T. Patil, Hence, Shri. P. T. Patil nominated by the house unanimously on the Academic Council.**

**[ 4 ] Nomination of One Principal, One Teacher and one graduate from amongst the Principals, Teachers and Registered Graduates of Senate to the Standing Committee under Section 70 (3) (e), (f) & (g) of Maharashtra Public Universities Act, 2016.**

[Note: As per Section 70 (3) (e), (f) & (g) of the Maharashtra Public Universities Act, 2016; Senate has to nominate One Principal, One Teacher and one graduate from amongst the Senate to the Standing Committee.

Any member present at the meeting may propose a name of any Principal, Teacher and graduate but the same name may be seconded by other member. The names for nomination are more than each one then the nomination shall be determined by majority votes].

**Resolution:**

1) **Prin. Dr. A. B. Shingade has proposed the name of Prin. Dr. D. S. Paricharak and Prin. Dr. G. N. Chitte has seconded the same. No other name was proposed by any other members present in the house. Since there was only one name of Prin. Dr. D. S. Paricharak, Hence, Prin. Dr. D. S. Paricharak nominated by the house unanimously on the Standing Committee.**
2) **Shri. G. R. Dharane has proposed the name of Dr. C. S. Chavan and Shri. D. A. Chavan has seconded the same. No other name was proposed by any other members present in the house. Since there was only one name of Dr. C. S. Chavan, Hence, Dr. C. S. Chavan nominated by the house unanimously on the Standing Committee.**
3) **Shri. R. S. Gaikwad has proposed the name of Shri. S. T. Sarawade and Shri. T. J. Gavade has seconded the same. No other name was proposed by any other members present in the house. Since there was only one name of Shri. S. T. Sarawade, Hence, Shri. S. T. Sarawade nominated by the house unanimously on the Standing committee.**

**[ ५ ] तक्रार निवारण समितीवर महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ७८ (३) (ङ) प्रमाणे दोन सदस्य नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, दि.०१/०३/२०१७ पासून अंमलात आला आहे.

दरम्यानच्या कालावधीत विद्यापीठाच्या विविध अधिकारमंडळाच्या निवडणूका ३१ ऑगस्ट, २०१७ पर्यंत पुढे ढकलल्याच्या महाराष्ट्र शासनाने १/१०/२०१६ रोजी प्रसिध्द केलेल्या राजपत्रात नमूद केल्याप्रमाणे "२०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२५ - कृषितर व तंत्रज्ञानेत्तर विद्यापीठांच्या प्राधिकरणांच्या व मंडळांच्या सदस्यांच्या निवडणूका तात्पुरत्या पुढे ढकलून त्या दि.२५/०९/२०१७ रोजी पार पडलेल्या आहेत.

महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ कलम ५७ (३) नुसार गठीत केलेल्या तक्रार निवारण समितीची मुदत ३१ ऑगस्ट, २०१५ रोजी संपुष्टात आलेली आहे.

नव्याने तक्रार निवारण समिती गठीत करणे अनिवार्य आहे. त्यास्तव सदर समितीवर अधिसभेच्या वतीने नामनिर्देशन करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ७९ (३) (ङ) नुसार तरतूद खालीलप्रमाणे:

| | |
|---|---|
| महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ७९ (३) (ङ) | अधिसभेने आपल्या सदस्यांमधून नामनिर्देशित केलेला, अनुसूचित जाती किंवा जमाती किंवा निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती) किंवा भटक्या जमाती किंवा इतर मागासवर्गातील एक अध्यापक व एक अध्यापकेतर कर्मचारी; |

सबब, तक्रार निवारण समितीवर महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ७९ (३) (ङ) नुसार दोन सदस्य नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ].

ठराव : **अ) श्री. एस. एम. गायकवाड यांनी डॉ. एस. के. शिंदे यांचे नाव सुचविले आणि त्यास डॉ. टी. व्ही. शिंदे यांनी अनुमोदन दिले. इतर कोणतेही नाव सभागृहात सुचविण्यात न आल्याने डॉ. एस. के. शिंदे यांचे तक्रार निवारण समितीवर नामनिर्देशन करण्यात आले.**

**ब) ॲड. ए. एस. कळके यांनी श्री. ए. बी. संगवे यांचे नाव सुचविले आणि त्यास श्रीमती ए. सी. चव्हाण यांनी अनुमोदन दिले. इतर कोणतेही नाव सभागृहात सुचविण्यात न आल्याने श्री. ए. बी. संगवे यांचे तक्रार निवारण समितीवर नामनिर्देशन करण्यात आले.**

[ ६ ] अधिसभा सदस्यांनी विचारलेले प्रश्न व त्यांना दिली जाणारी उत्तरे तसेच पूरक प्रश्न व त्यांना द्यावयाची उत्तरे, परिनियम ४७६(८) च्या तरतूदीमधील विनिर्दिष्टप्रमाणे अधिसभा सदस्यांना अन्य सदस्याने विचारलेल्या प्रश्नास दोन पूरक प्रश्न विचारता येतील.

(टिपणी: परिनियमानुसार स्विकृत केलेले प्रश्न आणि त्यांना व्यवस्थापन परिषदेने तयार केलेल्या उत्तराचे विवरणपत्र परिनियम क्र.४७६(७) अन्वये पाठविण्यात येईल).

ठराव: अ) प्रश्नोत्तराचा तास दुपारी ०३:१० वाजता सुरु झाला व दुपारी ०४:१० वाजता संपला.
ब) प्रश्नोत्तराच्या तासामध्ये विचारलेले प्रश्न, उपप्रश्न व त्यावर देण्यात आलेली उत्तरे याची प्रत सोबत जोडली आहे. (जोडपत्र "अ")

**[ ७ ] विद्यापीठाचा शै. वर्ष २०१६-१७ चा मराठी व इंग्रजी भाषेतील (पुस्तक व सीडी स्वरुपात) तयार केलेला १३ वा वार्षिक अहवालाबाबत व्यवस्थापन परिषदेने केलेली शिफारस विचारार्थ.**

प्राचार्या डॉ. श्रीमती के. ए. पांडे यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर केला आहे.

"ही अधिसभा, वार्षिक अहवाल समिती, अधिष्ठाता मंडह व व्यवस्थापन परिषदेने केलेल्या शिफारशी विचारात घेवून असा ठराव करते की, “व्यवस्थापन परिषदेने विद्यापीठाचा शै. वर्ष २०१६-१७ चा १३ वा वार्षिक अहवालाबाबत केलेल्या शिफारशी मान्य करुन मंजूर करण्यात याव्यात.”

(टिपणी: विद्यापीठाचा शै. वर्ष २०१६-१७ चा १३ वा वार्षिक अहवाल तयार करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| १) | डॉ. श्रीकांत येळेगावकर | अध्यक्ष |
| २) | डॉ. श्रीमती नभा काकडे | उपाध्यक्षा |
| ३) | डॉ. डी. जी. कदम | सदस्य |
| ४) | डॉ. सुहास पुजारी | सदस्य |
| ५) | डॉ. आर. एस. मेंते | सदस्य |
| ६) | श्री. ए. बी. जाधव | सदस्य-सचिव |

सदर समितीने तयार करुन दिलेला वार्षिक अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या दि.१४ जून, २०१८ रोजीच्या बैठकीतील विषय क्र.१२ नुसार विचारार्थ ठेवला असता खालीलप्रमाणे ठराव झाला.

| | |
|---|---|
| ठराव क्र.१२ | विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०१६-१७ च्या मराठी व इंग्रजी भाषेतील (पुस्तक व सी. डी. स्वरुपात) तयार केलेला १३ व्या वार्षिक अहवालाबाबत दुरुस्तीसह अधिसभेस मान्यतेची शिफारस करण्यात आली. |

सबब, विद्यापीठाचा सन २०१६-१७ चा मराठी व इंग्रजी भाषेतील (पुस्तक व सीडी स्वरुपात) तयार केलेला १३ वा वार्षिक अहवालाबाबत व्यवस्थापन परिषदेने केलेली शिफारस विचारार्थ).

ठराव: **विद्यापीठाचा शै. वर्ष २०१६-१७ चा मराठी व इंग्रजी भाषेतील (पुस्तक व सीडी स्वरुपात) तयार केलेला १३ वा वार्षिक अहवालाबाबत व्यवस्थापन परिषदेने केलेली शिफारस स्विकारुन एकमताने मान्यता देण्यात आली.**

[ ८ ] **अधिसभा सदस्य डॉ. टी. व्ही. शिंदे यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

सोलापूर विद्यापीठाशी संलग्नीत सर्व व्यावसायिक महाविद्यालयांची (BBA, BCA, MBA व BE) ची चौकशी करण्याची शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेकडे करित आहे.

ठराव: **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास डॉ. एच. के. आवताडे यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत डॉ. टी. व्ही. शिंदे यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.**

[ ९ ] **अधिसभा सदस्य श्री. एस. एम. गायकवाड यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

विद्यापीठाच्या पदवी व पदव्युत्तर वर्गासाठी घेण्यात येणारी सत्र परिक्षा पध्दत रद्द करुन वार्षिक परिक्षा पध्दती आंमलात आणण्याची शिफारस ही अधिसभा विद्या परिषद व व्यवस्थापन परिषदेकडे करित आहे.

ठराव: **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास डॉ. टी. जे. फुलारी यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत श्री. एस. एम. गायकवाड यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.**

मा. अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिवांनी जाहीर केले.

| | |
|---|---|
| कुलसचिव<br>सदस्य सचिव, अधिसभा | मा. कुलगुरु<br>अध्यक्ष, अधिसभा |

## विषय क्र. ०६ चे सहपत्र

## अधिसभेच्या मंगळवार, दि.१७ जुलै, २०१८ रोजी झालेल्या बैठकीमध्ये प्रश्नोत्तराच्या तासामध्ये अधिसभा सदस्यांनी विचारलेले प्रश्न, उपप्रश्न व त्यावर देण्यात आलेली उत्तरे

<table>
<tr><th>प्रश्न क्रमांक</th><th>प्रश्न</th><th>उत्तर</th></tr>
<tr><td colspan="2"><u>प्रा. डॉ. एम. बी. देशमुख</u></td><td><u>डॉ. जी. एस. कांबळे</u></td></tr>
<tr><td>१</td><td>In the University Depts. How many posts of Professors, Associate professor and Assistant Professors are filled & how many of them are vacant? Let me Know what action has been taken by the Solapur university to fill up the vacant positions?</td><td>विद्यापीठातील ६ संकुले व संकुलातंर्गत १७ विभाग कार्यरत आहेत. सोबत यादी जोडली आहे.<br>प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व सहायक प्राध्यापक मंजूर, भरलेली व रिक्त पदांची माहिती खालीलप्रमाणे:
<table>
<tr><th>Posts</th><th>Total sanctioned</th><th>Filled</th><th>Vacant</th></tr>
<tr><td>Professor</td><td>05</td><td>01</td><td>04</td></tr>
<tr><td>Associate Professor</td><td>10</td><td>03</td><td>07</td></tr>
<tr><td>Assistant Professor</td><td>22</td><td>20</td><td>02</td></tr>
<tr><td>Total</td><td>37</td><td>24</td><td>13</td></tr>
</table>
वरील तक्त्यातील एकूण रिक्त पदांच्या ५०% पदे भरण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०२(९) अन्वये मा. संचालक उच्च शिक्षण पुणे यांच्याकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेणे अनिवार्य आहे. त्यासाठी विद्यापीठ प्रशासनाने सोविसो/आस्था/२०१७/३६८३, दि.०६/०६/२०१७ नुसार ना-हरकत प्रमाणपत्र मिळण्याची विनंती केली. तद्नंतर जा.क्र. सोविसो/आस्था/२०१७/ ५१३२, दि.२१/०७/२०१७ नुसार पुन्हा विनंती करण्यात आली. परंतु संबंधित कार्यालयाकडून उत्तर अप्राप्त असल्याने जा.क्र.सोविसो/आस्था/२०१७/६७८७,दि.१३/०९/२०१७ नुसार नियमित रिक्त शिक्षकीय पदांची जाहिरात देवून आवेदन पत्र मागविण्याची विनंती करण्यात आली आहे. परंतु अद्यापपर्यंत मा. संचालक, उच्च शिक्षण पुणे यांच्या कार्यालयाकडून ना-हरकत प्रमाणपत्र वा परवानगी मिळण्याचे प्रलंबित आहे. त्यामूळे प्रस्तूत विद्यापीठातील रिक्त शिक्षकीय पदे भरणे संदर्भातील प्रक्रिया रखडली आहे. सोबत आपल्या सुलभ संदर्भासाठी मा. संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांच्या कार्यालयास दि.०६/०६/२०१७ दि.२१/०७/२०१७ व दि.१३/०९/२०१७ रोजी पाठविलेल्या पत्रांच्या छायांकित प्रती जोडल्या आहेत.</td></tr>
<tr><td>२</td><td>What examination pattern the Solapur university wants to run in near future to enhance the quality & standard?</td><td>विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळाने (उदा. अभ्यासमंडळे, विद्याशाखा, विद्या परिषद, परीक्षा मंडळ इ.) त्यांच्या विविध बैठकांमध्ये पारित केलेल्या ठरावानुसार विद्यापीठाच्या परीक्षा पध्दतीमध्ये भविष्यामध्ये बदल करण्यात येईल.</td></tr>
</table>

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| | • Which pattern like to continue part time? We there semester examination annual examination or this is your programme and which is the batter? | That purpose we have introduces online examination and because board of examination authorities which will be give the instruction to the others and from the this year introduces online and entrance examination the same time online process also and in the future we are going to start in screen activation also so this is the task which we are going to introduce. |
| | • What is your pattern semester or annual pattern this continues assessment? | The Semester Pattern. |
| | • What's internal revaluation how may percentage there? | 70% 30% |
| | • There is farm of examination or farm of tutorial? | That internal assessment is for to test there and single as there and 70% as their internal. |
| ३ | What measures the University has taken to increase quality of the research & how many National / International MOUs are signed by the Solapur University so far? | • Solapur University has strictly follows the UGC regulation regarding quality of research<br>1) Publication of research paper in minimum impact factor SCI / Scopus indexed journals.<br>2) Solapur University has established IPR Cell to promote Teachers / Student to file patents / copyrights.<br>3) Solapur University has provided seed money grants & start up research grant to encourage research culture in young faculty of University & Colleges.<br>• Solapur University has made 21 National and 2 International MOUs with various University and Institutes. |
| <u>डॉ. एच. के. आवताडे</u> | | <u>प्राचार्या डॉ. श्रीमती के. ए. पांडे</u> |
| ४ | सोलापूर विद्यापीठाच्या सन २०१८ च्या BBA परिक्षेतील गैरव्यवहाराबाबत प्रमाद समितीने शिफारस केल्याप्रमाणे संबंधीत महाविद्यालयाने कार्यवाही केली आहे काय? कार्यवाही केली असल्यास काय कार्यवाही केली? | महाविद्यालयाने कार्यवाही केली आहे. संबंधित अध्यापकावर शिस्तभंगाची कार्यवाही करुन सदरील अध्यापकांचे माहे एप्रिल, २०१८ चे वेतन स्थगित केल्याबाबत महाविद्यालयाने कळविले आहे. |
| | • माहे एप्रिल, २०१८ चे वेतन स्थगित कोणत्या नियमाने केले आहे करता येत का अस? | वेतन सध्या स्थगित केलेलं आहे, दिलेलं नाही किंवा पुढ देणार नाही असं कुठं त्याचा उल्लेख केलेला नाही. |
| | • Ordinance मध्ये अशी कुठलीच तरतूद नाही तरी त्या महाविद्यालयाने असं कसं काय केलं आहे? | Ordinance मध्ये तरतूद नाही. Immediate action म्हणून महाविद्यालयाने कार्यवाही केली आहे. |
| | • विद्यापीठाच्या Ordinance नुसार तरतूद काय आहे आणि आपण त्या तरतूदीनुसार काय कार्यवाही केली आहे? | प्रश्नामध्ये महाविद्यालय आहे विद्यापीठ नाही. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| **श्री. एस. एम. गायकवाड** | | **डॉ. जी. एस. कांबळे** |
| ५ | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ मधील तरतुदीनुसार सोलापूर विद्यापीठाने किती नियमित संचालक व अधिष्ठातांची नेमणूक केली? | १) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ मधील तरतूदीनुसार संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ हे नियमित पद भरण्याची कार्यवाही सुरु आहे आणि संचालक, क्रीडा व शारिरीक शिक्षण हे पद भरलेले आहे.<br>२) महाराष्ट्र शासनाकडून अद्याप सोलापूर विद्यापीठास अधिष्ठातांची पदे मंजूर झालेली नाहीत. तथापि, नवीन विद्यापीठ कयद्यानुसार शैक्षणिक कामकाज पार पाडण्यासाठी अभ्यासमंडळे विभागाने संदर्भ क्र.सोविसो /अमंवि/ परिपत्रक/ २०१८/ ४२३९, दि.१८/०५/२०१८ अन्वये तात्पुरत्या अधिष्ठातांची नियुक्ती केली आहे. सोबत परिपत्रकाची प्रत जोडली आहे. |
| | • तात्पुरत्या अधिष्ठातां नेमलेले आहेत त्यांना नेमत असताना तुम्ही शासनाची परवानगी घेतलेली आहे का? | तात्पुरत्या अधिष्ठाता नेमणूक करत असताना कुलगुरुंच्या अधिकाराखाली त्यांच्या नेमणूका घेत असतो. त्यामुळे यासंदर्भात शासनाची कुठलीही परवानगी घेण्यात आलेली नाही. |
| | • आणि हे सर्व डीन पात्र आहेत का त्या पदाला? | हे पात्र आहेत. |
| | • पात्र असल्यास आपण त्यांना देण्यात येणारे सुविधा आहेत ह्या तात्पुरत्या स्वरुपाच्या डीनला ह्या सुविधा देता येतात का किंवा जे काही मानधन आहे किंवा तरतूद आहे का? | त्यांना कुठल्याही सुविधा देत नाही आदेशात नमूद केल्याप्रमाणे कोणतेही मानधन देण्यात येत नाही. |
| | • BOS चेअरमन व्हायला दोन विद्यार्थी पीएच. डीचे अवार्ड होणं गरजेच आहे, डीन व्हायला विद्यार्थी allot नसतील किंवा अवार्ड नसतील किंवा विद्यार्थी बाहेर पडले नसतील तर तो डीन होवू शकतो का? | BOS चेअरमन व्हायला दोन विद्यार्थी पीएच. डीचे अवार्ड होणं बरोबर आहे पण डीन साठी असं कुठं उल्लेख नाही. |
| | • Bos Chairman मधून पूर्वी Dean निवडले जायचे, तुम्ही Temparary Dean हा Criteria कसा काय follow केला नाही? | २०१६ च्या तरतूदीनुसार कार्यवाही केली आहे. |
| | • आपल्या ज्या कायद्यामध्ये shall be the Qulification चा उल्लेख आहे याचा अर्थ Associate Professor हे सुध्दा Eligible होवू शकतात का? | होवू शकतात. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| ६ | सोलापूर विद्यापीठाने २०१६-१७ कालावधीत कोणत्या व किती कार्यासन अधिकाऱ्यांची नेमणूक केली? केली असल्यास कोणत्या नियमानुसार नेमणूक केली? | सोलापूर विद्यापीठाने सन २०१६-१७ या कालावधीत श्री. नारकर एस. ए. व श्री. इनामदार आय. ए. यांची विशेष कार्यासन अधिकारी म्हणून नियुक्ती केली होती. सदरची नियुक्ती शासन निर्णय क्र.संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दि.०८ जानेवारी, २०१६ व दि.१७ डिसेंबर, २०१६ नुसार करण्यात आली आहे. सोबत दि.०८ जानेवारी, २०१६ व दि.१७ डिसेंबर, २०१६ रोजीच्या निर्णयाची प्रत जोडली आहे. |
| | • ज्यांची नियुक्ती केलेली आहे ते पात्र आहेत का? | ते पात्र आहेत. |
| | • त्यासाठी वयाची मर्यादा आहे का? | ७० वर्षापेक्षा जास्त असू नये अशी वर्याची Condition आहे. |
| | • नारकर यांना शासन नियमानुसार अधिक वेतन आदा केले आहे का? | शासन नियमाच्या तरतूदीत नमूद केल्याप्रमाणे जास्त वेतन दिलेले नाही. |
| | • नारकर यांची १२९ दिवसाची सेवा झाली यामध्ये fulfill पेमेंट दिले यामध्ये विद्यापीठाच नुकसान झाल नाही का? | १२९ दिवस सेवा झाली असल्याने त्यांना तेवढेच पेमेंट दिले आहे. |
| **प्रा. ए. एम. काळजे** | | **प्राचार्या डॉ. श्रीमती के. ए. पांडे** |
| ७ | सोलापूर विद्यापीठाकडे किती महिला कर्मचाऱ्यांच्या (२०१६-१७ कालावधी) तक्रारी दाखल झाल्या आहेत? असल्यास विद्यापीठाने संबंधीत तक्रारीबाबत काय कार्यवाही केली आहे? | सन २०१६-१७ या कालावधीत विद्यापीठाच्या अंतर्गत तक्रार निवारण समितीकडे ०१ महिला कर्मचाऱ्याने तक्रार दाखल केली आहे. तसेच सदरची तक्रार पोलीस ठाण्यातही दाखल केली आहे व सद्यस्थितीत गुन्हा नोंद झाल्याबाबतचे पत्र मा. पोलीस उपनिरीक्षक, फौजदार चावडी, पोलीस स्टेशन, सोलापूर शहर यांनी या कार्यालयास दि.२२/०३/२०१७ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. संबंधित प्रकरणाचा पुढील तपास पोलीस विभागाकडून सुरु असून याकामी विद्यापीठ प्रशासन पोलीस विभागास सर्वतोपरी सहकार्य करत आहे. |
| | • विद्यापीठाने चौकशी समिती नेमली होती का, चौकशी समिती सदस्यांची नावे सांगावेत? | २०१६-१७ मध्ये चौकशी समिती नेमलेली होती. |
| | • चौकशी समिती नेमल्यानंतर विद्यापीठाकडे अहवाला आला, त्यानंतर काय कार्यवाही केली? | २०१७ च्या मध्येच हे झालेलं आहे. त्याच्यामध्ये पोलीसांची तक्रार हा एक भाग आणि आपण नेमलेली कमिटी हा एक भाग पण आता आपल्याला याच्यापुढे जे काही करायचे आहे ते आपल्याला करण्याकरिता परत विचार करावा लागेल आतापर्यंत विद्यापीठाकडे ती प्रक्रिया याच्याकरिता थांबली आहे.<br>याच्याकडे प्रत्यक्षपणे लक्ष दिले जाईल. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| ८ | सर्व अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रिया संपल्यानंतर सोलापूर विद्यापीठाने महाविद्यालयांकडून GST आकारणी कोणत्या पत्राने व किती आकारली? यांस अधिकार मंडळाची मंजूरी आहे काय? | विद्यापीठ एम. के. सी. एल. मार्फत घेत असणाऱ्या सुविधांना सर्व कर लागू करणेबाबत दि.१८ जुलै, २०१७ रोजी संपन्न झालेल्या व्यवस्थापन परिषदेने ठराव क्र.४ (२१) अन्वये मान्यता दिलेली आहे.<br>• एम. के. सी. एल. पुणे यांच्याकडून दि.०८/०२/२०१८ रोजी प्राप्त झालेले ई-सुविधा शुल्काचे देयक.<br>• शासन अधिसूचना क्र.१२/२०१७- Central Tax (Rate), दि.२८/०६/२०१७ या दोन संदर्भिय पत्रास अनुसरुन दि.२३/०४/२०१८ रोजीचे पत्र क्र. सोविसो /ई-सुविधा/पात्रता विभाग/२०१७-१८/३४८१ अन्वये ई-सुविधा करिता प्रति विद्यार्थी ९ रुपये इतके GST शुल्क आकारण्यात आले. |
| | • परीक्षा जेव्हा सुरु होते तेव्हा हे Circular आलेलं आहे, हे महाविद्यालय कसं वसूल करणार, गेलेल्या विद्यार्थ्यांकडून जे TY BA, TY BSC, TY B.com हे शुल्क कसे वसूल करणार विद्यार्थ्यांकडून? | मार्कलिस्ट घेण्यासाठी जेव्हा ते येतील त्यावेळेस हे ९ रुपये वसूल करण्यात येईल. मार्कलिस्ट Already प्रत्येक महाविद्यालयाने घेवून गेलेले आहेत आणि आता काही बऱ्याचश्या महाविद्यालयाकडून Already पैसे भरलेले आहेत. |
| **डॉ. एस. के. शिंदे** | | **प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे** |
| ९ | सोलापूर विद्यापीठाच्या क्रिडा विभागाने ॲथलेटीक ट्रॅक तयार करण्यासाठी आराखडा मंजूर करुन त्याप्रमाणे काम झाले आहे काय? या ट्रॅक साठी आत्तापर्यंत किती रक्कम खर्च झाली आहे? | होय. ॲथलेटीक ट्रॅक तयार करण्यासाठी ₹३०,५२,६००/- रुपयांची तांत्रिक मंजूरी मिळालेली आहे. तसेच सा. बां. विभागाच्या दि.१५/०५/२०१८ रोजी प्राप्त झालेल्या उपयोगिता प्रमाणपत्रानुसार ॲथलेटीक ट्रॅकसाठी ₹२४,२४,१२३/- रक्कम खर्च झालेली आहे. |
| | • ॲथलेटीक ट्रॅक पण हा तांत्रिक समितीच्या शिफाशीनुसार झाला का ह्याची पडताळणी केली आहे का विद्यापीठाने? | होय. |
| | • त्याचा अहवाल आहे का? | त्याचा अहवाल आलेला नाही. |
| | • सदरहून ट्रॅक हा तांत्रिक समितीची मान्यता आहे जे म्हणतात त्याच्या नुसार झालेला नाही आहे का? | होय. |
| | • त्या ठिकाणी आपण टाकलेला मुरुम जो आहे तो बांधकाम विभागाच्या नियमानुसार आहे का? | आहे. |
| १० | AIHC चे अभ्यासमंडळ अस्थायी का आहे? | AIHC मधून विभागप्रमुख निवडून न आल्याने सदर अभ्यासक्रमाचे अस्थायी अभ्यासमंडळाचे गठन करण्यात आले आहे. |
| | • डॉ. विकास कदम, डॉ. रविकिरण जाधव आणि विद्यापीठात कार्यरत असलेल्या डॉ. माया पाटील ह्याच्या बिनविरोध निवडून आल्या आहेत का? | नाहीत. सदरचे अभ्यासमंडळ Ad-hoc आहे. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| डॉ. टी. जे. फुलारी | | प्राचार्या डॉ. श्रीमती के. ए. पांडे |
| ११ | सन २०१७-१८ या वर्षात मंगळवेढेकर इन्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, सोलापूर च्या संचालक पदावर कुणाची नेमणूक करण्यात आली? ही नियुक्ती नियमाप्रमाणे आहे काय? | सन २०१७-१८ या वर्षात मंगळवेढेकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, सोलापूर या महाविद्यालयाच्या संचालक पदी डॉ. श्रीकांत येळेगावकर यांच्या विद्यापीठ निवड समितीने केलेल्या नियुक्तीस मा. कुलगुरु महोदयांच्या आदेशान्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर मान्यता देण्यापूर्वी संस्थेने जाहिरात देवून संचालक पदासाठी अर्ज मागविण्यात आले होते. तसेच सदर अर्जाच्या छाननी समितीने छाननी करुन या कार्यालयास विद्यापीठ निवड समितीची मागणी केली होती. त्यानुसार विद्यापीठ निवड समितीने मुलाखत घेवून सदर संचालक पदी डॉ. येळेगावकर यांची शिफारस केली होती. मा. कुलगुरु महोदयांनी आदेशित केल्यानुसार डॉ. श्रीकांत येळेगावकर यांच्या संचालक पदी नेमणूकीस मान्यता देण्याकरिता प्राचार्य डॉ. डी. डी. पुजारी, मा. प्रभारी अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन, यांचा अभिप्राय घेण्यात आला त्या अभिप्रायानुसार मा. कुलगुरु महोदयांच्या आदेशान्वये मान्यता देण्यात आली. |
| | • सदरहू संस्थेस A. I. C. T. E. ची मान्यता आहे का? | होय. |
| | • तिथे एम. बी. ए. कोर्स आहे का? | एम. बी. ए. ला A. I. C. T. E. ची मान्यता आहे. |
| | • A. I. C. T. E. च्या नॉर्मप्रमाणे त्या संचालकाची नियुक्ती केली आहे का? | त्या पदावर ही नियुक्ती शासनाने दिलेल्या दि.१९/१०/२०१० च्या जी. आर. प्रमाणे करण्यात आलेली आहे. |
| | • ज्या वेळेला एका महाविद्यालयात एम. बी. ए. कोर्स असतो त्या वेळेला संबंधीत डायरेक्टरला A. I. C. T. E. ची मान्यता घ्यावी लागते का U. G. C. ची? | A. I. C. T. E. ची. |
| | • A. I. C. T. E. च्या नॉर्मस् नुसार त्यांची निवड झाली आहे का? | नाही. |
| | • मान्यता कोणत्या आधारावर दिलेली आहे? | शासनाच्या जी. आर. च्या आधारावर. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १२ | विद्यापीठातील फर्नीचर खरेदी प्रक्रिया नियमाप्रमाणे झाली आहे काय? | विद्यापीठ परिसरातील वर्क स्टेशनसाठी लागणारे मॉड्यूलर फर्निचरचे काम करणे काम संदभ क्र.१ अन्वये दि.०५/०२/२०१६ रोजी बांधकाम समिती समोर विषय क्र.१०(२) अन्वये सदर कामाची प्रशासकीय मान्यतेची शिफारस करण्यात येवून दि.२३/०२/२०१६ रोजीच्या व्यवस्थापन परिषद समिती बैठकीमधील ०६ अन्वये विषयांकित कामाची प्रशासकीय मान्यता घेण्यात आली. तसेच दि.१५/१०/२०१६ रोजीच्या खरेदी समितीने ठराव क्र.३(१) व्यवस्थापन परिषदेला शिफारस केलेली होती व त्यास दि.२५/१०/२०१६ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमध्ये ठराव क्र.१२ (९) अन्वये प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. सदर कामासाठीच्या जाहिर निविदा प्रसिध्दीकरण दि.०६/१०/२०१७ रोजी मान्यता घेवून दै. पुण्य नगरी या वृत्तपत्रात दि.११/१०/२०१७ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली. निविदा विद्यापीठ कार्यालयाकडे पोहोच करण्याची अंतिम तारीख दि.०१/११/२०१७ पर्यंत होती. दिलेल्या मुदतीत चार निविदा प्राप्त झाल्या.प्राप्त सर्व निविदा तांत्रिक समितीच्या उपसमिती व वित्त व लेखा अधिकारी यांच्यासमोर दि.१३/१२/२०१७ रोजी तांत्रिक निविदा उघडण्यात आल्या. दि.१२/१२/२०१७ रोजी दराची निविदा उघडण्यात आली. त्यानुसार दि.०७/०२/२०१८ रोजीच्या खरेदी समितीसमोर विषय क्र.२ अन्वये व्यवस्थापन परिषद बैठकीमधील १० अन्वये मान्यता घेण्यात आली. मे. विश्वकर्मा एंटरप्रायझेस यांना सुरक्षा ठेव रक्कम भरण्यास पत्र पाठविण्यात आल्या नुसार पावती क्र.१८६७२, दि.०१/०३/२०१८ रोजी सुरक्षा ठेव रक्कम भरण्यात येवून पावती कार्यालयास जमा करण्यात आली. तद्नंतर वर्क ऑर्डर देण्यात मान्यता घेण्यात येवून (रुसा अंतर्गत) वर्क स्टेशनसाठी लागणारे मॉड्यूलर फर्निचरचे काम करणे वर्क ऑर्डर देण्यात आली. सदर वर्क ऑर्डर प्रमाणे काम केलेले असून सदरचे देयक मे. विश्वकर्मा एंटरप्रायझेस यांनी सादर केल्यानंतर वर्क ऑर्डर प्रमाणे काम करण्यात आलेले असून ६५% इतके फर्निचरचा पुरवठा मे. विश्वकर्मा एंटरप्रायझेस यांनी केलेला असल्याने त्याप्रमाणे देयक आदा करण्याकरिता सदर कामाचे कन्सल्टंट दिपाली असोसिएट्स यांनी कळविले. तद्नंतर विद्यापीठ परिसरामध्ये (रुसा अंतर्गत) वर्क स्टेशनसाठी लागणारे मॉड्यूलर फर्निचरचे काम करणे या कामाकरिता मे. विश्वकर्मा एंटरप्रायझेस यांच्याकडून प्राप्त देयक (मटेरिअल किंमत) रु.३९,८६,१६१/- पैकी रु.३५,००,०००/- इतकी रक्कम अग्रिम म्हणून आदा करण्यास, येणाऱ्या खर्चास व येणारा खर्च हा Furniture of Work Station (RUSA) या अंदाजपत्रकीय शिर्षकाखाली खर्ची टाकण्यात आलेले आहे. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| **प्रा. डॉ. जी. डी. बिराजदार** | | **प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे** |
| १३ | इ. स. २०१५-२०१८ या कालावधीत सोलापूर विदयापीठाच्या किती कर्मचाऱ्यांचे व संचालक, विदयापीठ व महाविद्यालयीन विका मंडळ यांचे मानधन विदयापीठाच्या विकास निधीतून देण्यात आले? संबंधितांचे नांवे व रक्कम किती आहे? | कोणत्याही कर्मचाऱ्यास अथवा संचालक, विद्यापीठ व महाविद्यालयीन विकास मंडळ यांना मानधन स्वरुपात कोणतीही रक्कम दिलेली नाही. |
| | • मेटकरी, देवकन्या पांढरे आणि आर. वाय. पाटील यांचे वेतन विद्यापीठ विकास निधीतून दिले आहे का? | मेटकरी, देवकन्या पांढरे यांना दिलेले आहे. बाकी लोकांचं जसं तेच पेस्केल आहे तसं त्यांना मिळालेलं आहे. |
| | • असं वेतन किंवा मानधन विद्यापीठ विकास निधीतून देता येतं का? | व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेनुसार देता येते. |
| १४ | BBA व BCA चे मूल्यमापन केंद्र कुठे आहे? | BBA व BCA चे मूल्यमापन केंद्र हे मुख्य मध्यवर्ती मूल्यमापन केंद्र - संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर व उपमध्यवर्ती मूल्यमापन केंद्र हे के. बी. पी. महाविद्यालय, पंढरपूर येथे आहे. |
| **डॉ. टी. व्ही. शिंदे** | | **प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे** |
| १५ | विद्यापीठाने मुनीजन आणि पंतप्रधान स्वच्छता अभियान ग्रामदत्तक योजनेत कोणती गावे दत्तक घेतली व सदर गावांमध्ये विकासाठी राबविण्यात आलेले उपक्रम व त्यासाठी किती रक्कम खर्च झाली? | याचा आढावा सोबत जोडले आहे. |
| | • ७०-७० हजार रुपये अनुदान देत असताना विद्यापीठान काही गाईडलाईन दिलेली होती का, की खर्च कसे करावेत? | यासाठी समिती गठीत करण्यात आलेली होती. समितीने दिलेली कामं करावीत असे सांगण्यात आले होते. |
| | • त्याच लेखापरीक्षण आलेल आहे का? | Social Audit झालेलं आहे. |
| १६ | विद्यापीठाच्या गत वर्षीच्या लेखा परिक्षणाचा अहवालामध्ये नमूद केलेल्या आर्थिक अनियमिततेच्या ताशेऱ्याबाबत विद्यापीठाने काय कार्यवाही केली? | १) लेखापरिक्षण अहवालातील उपस्थित परिच्छेद संबंधित विभागास कळविण्यात येवून त्यांच्याकडून अनुपाल अहवाल प्राप्त झाला. लेखासंहिता मधील तरतूद १.५०(h) & (i) नुसार लेखापरिक्षण परिच्छेद वगळणे शिफारस समितीपुढे उपस्थित परिच्छेद व विभागाचा अनुपालन अहवाल ठेवण्यात आला. त्यावर समितीने केलेला शिफारस अहवाल सोबत जोडला आहे.<br>२) लेखापरिक्षण अहवालातील उपस्थित आक्षेप क्र.१ मधील आग्रीम रकमाची कार्यवाही पूर्ण झालेली आहे व आक्षेप क्र.२ मधील आग्रीम रकमा संदर्भात परिपत्रक क्र.SUS/F & AO/२०१७-१८/५०७, दि.०८/०२/२०१७ अन्वये संबंधितांना कळविण्यात आलेले आहे.<br>३) लेखा परिक्षणातील उपस्थित सूचनेप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| | • कोणकोणत्या स्टाफ व महाविद्यालयाने किती पैसे परत केले? | लिस्ट मिळून घेतल्यानंतर माहिती सविस्तर देण्यात येईल. |
| **श्री. एस. टी. सरवदे** | | **डॉ. जी. एस. कांबळे** |
| १७ | विद्यापीठाने ४८२ एकर जमीनीवर कोणकोणत्या सुधारणा केल्या आहेत? | विद्यापीठाने ४८२ एकर जमीनीवर कंम्पाऊंड वॉल तयार केलेले असून सदर जमिनीवर झाडे लावण्यात आलेली आहेत. तसेच प्रशासकीय इमारत बांधणीसाठी तांत्रिक मंजूरी प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे. |
| | • ४८२ एकर कंम्पाऊंड वॉल तयार केलेले आता तर इथं सांगितलं कंम्पाऊंडसाठी सुविधा निर्माण करायचीयं, टेंडर काढायचायं सुरवातिलाच दाखविलं मॅडमच्या अहवालामध्ये? | ४८२ एकर कंम्पाऊंड वॉल बनविलेल आहे आत्तापर्यंतची ती दीड किलामिटर पूर्ण झालेली आहे आणि याच्या नंतर साधारणपणे साडेपाच किलोमीटरची कंम्पाऊंड वॉल आहे ती estimated आहे. त्यामूळे पूर्ण कंम्पाऊंड वॉल बनवून झालेलं नाही. तर काही किलामिटर पूर्ण झालेलं आहे तर काही प्रमाणात ती प्रोसेस सुरु आहे. |
| | • २०१६-१७ व १७-१८ या वर्षात वॉल कंम्पाऊंडवर किती पैसे खर्च झालेत? | दीड कोटी. अजून सोडेतीन कोटी खर्च होण्याचे आहे. |
| | • २०१६-१७ व १७-१८ या वर्षात किती झाडाचे वृक्षारोपण करण्यात आले? | माहिती घेवून सांगण्यात येईल. |
| | • ४८२ एकरावर इतर लोकांच अतिक्रमण झालेल आहे का? | ५ एकरवर साधारणपणे ५ + आहे थोडंसं काही शेड्स लोकांनी टाकली आहेत आणि त्या करिता आमचं जे काम सुरु आहे, कमिशनर साहेबांशी बोलणं, कमिटी त्याच्यावर चर्चा करणे ते सुरु आहे आणि ते हटवण्याचं प्रयत्न केलेला आहे. |
| | • सोलापूर विद्यापीठाच्या ४८२ एकर वर जे CCT वर जे वृक्षारोपण केलं त्याच्यातली किती परसेंटेज झाडे जिवंत आहेत? | माहिती घेवून सांगण्यात येईल. |
| १८ | VVIP Guest House मध्ये २०१५ ते २०१८ या कालावधीत किती गेस्ट राहिले? त्यांची नावे व कालावधी काय आहे? | प्रत्यक्षात VVIP Guest House राहण्यासाठी सन २०१६ मध्ये कार्यान्वित झालेले आहे. दि.२७/१२/२०१६ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीतील ठराव क्र.७ नुसार विद्यापीठ परिसरामध्ये नव्याने बांधकाम करण्यात आलेले व्ही. व्ही. आय. पी. अतिथीगृह हे विद्यापीठ परिसरामध्ये कुलगुरु निवासाचे बांधकाम होईपर्यंत कुलगुरु निवास म्हणून वापरण्यास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार माजी कुलगुरु डॉ. एन. एन. मालदार हे त्यांचा कार्यकाळ पूर्ण होईपर्यंत तेथे राहीले आहेत. तद्नंतर प्रभारी कुलगुरु डॉ. करमळकर हे विद्यापीठाच्या विविध बैठकासाठी उपस्थित असताना थोडफार वेळ विश्रांतीसाठी VVIP Guest House येथे थांबले होते. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| | • माजी कुलगुरु डॉ. मालदार हे भाड्याच्या घरात राहत होते त्यांना विद्यापीठ भाडं देत होत असं काय घडलं की त्यांना पुन्हा गेस्टहाऊस मध्ये येवून राहावं लागलं जे पाहूण्यांसाठी असतं? | सदर भाडेकरार जो आहे तो ०१/०१/२०१६ ते ३१/१२/२०१६ या वर्षाच्या कालावधीकरिता महिन्याला २४,२००/- भाडेतत्वावर करण्यात आला होता. सदर भाडेकराची मुदत ही चालू महिन्याच्या म्हणजे त्या वेळेस म्हणजे ३१ तारखेला म्हणजेच ३१ डिसेंबर, २०१६ रोजी संपत होती. नवीन भाडेकरार Continue करण्यापेक्षा इथं जे VVIP Guest House अंतिम टप्प्यात होत आणि ते VVIP Guest House मध्ये शिफ्ट झाले. जेणेकरुन आपल्याला २४,२००/- महिन्याला आपण भरत होतो ते आपले वाचले. |
| १९ | परीक्षेच्या संबंधी नियम ०.१०६ (ब) २०१५ चे प्रयोजन व हेतू काय आहे? | परीक्षेचा निकाल जाहिर झाल्यानंतर प्राप्त झालेल्या गुणाबाबत विद्यार्थ्यांचे समाधान झाले नसल्यास अशा विद्यार्थ्यास संबंधित विषयाच्या मूळ उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत अध्यादेशातील नमूद केलेल्या तरतूदीनुसार मागणी करता येते. संबंधित विषयाची छायांकित प्रत प्राप्त झाल्यानंतर प्राध्यापकाने दिलेल्या गुणाबाबत जर विद्यार्थी समाधानी नसेल तर पूर्नमूल्यांकनासाठी अर्ज करण्याची सुविधा या अध्यादेशाद्वारे उपलब्ध करुन दिली आहे. |
| | • पीएच. डी. कोर्सच्या परीक्षेची उत्तरपत्रिका Revaluation का दिली नाही किंवा देता येत नाही? | Ordinanace मध्ये तशी तरतूद नाही. |
| | • कोर्सवर्क फ्री पीएच. डी. ची जी लेखी परीक्षा होती त्या लेखी परीक्षेच जर परीक्षार्थान जर फोटोकॉपी मागितली तर आपल्याला देता येते का नाही? | देता येत नाही व तशी तरतूदच नाही. |
| | • १५ जुलैच्या दिव्य मराठीच्या अंकामध्ये इंजिनिअरींग कॉलेजचे ४५६१ विद्यार्थ्यांचे Revaluation साठी अर्ज आले आहेत हे खरं आहे का? | होय. |
| | • इतक्या मोठ्या प्रमाणामध्ये Revaluation जर पेपर येत असतील तर Revaluation झाल्यानंतर जो Difference होतो त्यात पहिला असेसरवर ॲक्शान घेतली जाते का? | २०% पेक्षा जास्त मार्कामध्ये जर फरक पडला तर आपण ॲक्शान घेतो. |
| | • ४००० विद्यार्थ्यांनी फोटोकॉपी मागविलेली आहे त्याच्यामध्ये किती विद्यार्थ्यांचे चेंजेस झालेले आहेत? | हे जे आकडे आहेत ते २०१८ चे आहेत त्यामूळे याची प्रोसेस जे आहे ते सुरु आहे. |
| | <u>प्रा. जी. आर. धरणे</u> | <u>प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे</u> |
| २० | बहिशाल अध्यापणासाठी समिती गठण झाली का? त्याची कार्य-कक्षा निश्चित केली का? | सध्या झालेली नाही. |
| | • ती कधी केली जाणार आहे? | ते आपण करुया. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| २१ | "Soft skill life Skill" "Personality development" "Interview Technique" या सारख्या कार्यक्रमांचे आयोजन कसे करता येईल. तसेच "Spoken English" "Report Writing" लिखाणाचे काम घेता येईल का? | ही बाब Communication Skills हा अभ्यासक्रमातून मांडली आहे. |
| २२ | "Skill based Microproject" ची आवश्यकता त्यासाठी "Textiles manufacturing designing hoiery garments" "packing of various item" "Home delivery of fruits, vegetable grains, ग्रहपयोगी वस्तुंचे विक्री व्यवस्थापन"? | याबाबत कार्यवाही करता येईल. |
| **श्रीमती ए. सी. चव्हाण** | | **प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे** |
| २३ | प्रत्येक विषयाच्या बोर्ड ऑफ स्टडीज् (BOS) मिटींग मध्ये टॉपर विद्यार्थ्यांचा सहभाग करुन घेतला आहे का? | नाही, काही अभ्यासमंडळाच्या बैठकांना बोलाविले आहे तर काही अभ्यासमंडळाच्या बैठकांना बोलाविले नाही. |
| | • त्यांनी नावे सांगता येतील का? | Education Board च्या विद्यार्थ्यांना बोलविले होते. |
| २४ | क्रीडा व सांस्कृतिक, NSS NCC व इतर ॲक्टीव्हीटीत सहभागी असणाऱ्या विद्यार्थ्यांची फेरपरिक्षा घेण्यात येते का? | फेरपरीक्षा घेण्यात येत नाही. तथापि, अशा विद्यार्थ्यांना संबंधित कालावधीतील पेपर देता येत नसल्यामूळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी दि.०७/११/२०१३ रोजीच्या विद्या परिषदेतील ठराव क्र.१५८ नुसार खेळाडूंना Carry on ची सुविधा दिली जाते. |
| | • Re-Admission ची सुविधा त्याला त्याच क्लासमध्ये देता येते का? | स्टेट लेवल किंवा नॅशनल लेवलचा खेळाडू असेल तर त्याला Re- Admission देता येते. Documentation Procedure पूर्ण करावी लागते. |
| | • Re-Admission देता येत असेल तर अनेक महाविद्यालयांनी मागच्या ३ ते ४ वर्षामध्ये अशा राष्ट्रीय खेळाडूंना Re-Admission दिलेलं नाही तर त्याची आपल्याकडे माहिती आहे का असल्यास सादर करावी? | कुणी Re-Admission दिलेलं नाही असं विद्यापीठाकड काय आलेलं नाही. |
| **सौ. आर. ए. महागांवकर** | | **प्राचार्या डॉ. श्रीमती के. ए. पांडे** |
| २५ | सोलापूर विद्यापीठातील Language department सुरु होणे संबंधीत आहे.<br>अ) प्रवेश परिक्षा घेणे गरजेचे आहे का? | कोणत्याही अभ्यासक्रमास प्रवेश परीक्षा असावी किंवा नसावी याबद्दलचा निर्णय पदव्युत्तर प्रवेश परीक्षा समिती किंवा संबंधित संकुल किंवा विद्यापीठ प्राधिकरणामार्फत ठरविली जाते. |
| **ॲड. श्रीमती एन. एस. मंकणी** | | **प्राचार्या डॉ. श्रीमती के. ए. पांडे** |
| २६ | Budget Monitoring committee तयार झाली का, त्याची कार्यकक्षा व अधिकार आणि कार्यवाही कशी करता येईल? | Budget Monitoring committee तयार झालेली नाही. |

**(सचिव अधिसभा)**
कुलसचिव